बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२२६ | बुधवार दि.०८ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -226 | WEDNESDAY DT. 08 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4


MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात



## विनायक मेटे यांच्या जवळून राजेंद्र मस्के ला तोडून मुंडे भगिनींनी कायम नेत्यांना विरोध केला



# बेलेश्वर येथील एका जाहीर रित्या कार्यक्रमात पंकजा मुंडे विनायकराव मेटे एका कार्यक्रमाच्या स्टेजवर असताना बीड का आमदार कैसा हो राजेंद्र मस्के जैसा हो

## अशा आश्चर्याच्या घोषणा कोण देत होतं मेटे समर्थक का मुंडे समर्थक?



- पंकजाताई मुंडे यांच्या जवळच्या समर्थकांकडून जालना रोडवरील हॉटेलमध्ये ज्योतीताई मेटे यांच्या भूमिकेवर तर्कवितर्क लावून चर्चा करण्याची गरजच काय?
- स्वर्गीय विनायकराव मेटे व पंकजाताई मुंडे यांच्यात राजकीय दुरावा याच बगलबच्चा भाजपच्या दलाल वृत्तीच्या भडव्या कार्यकर्त्यांमुळंच निर्माण झाला होता.
- आता याच बीड जिल्हा भाजपच्या दलाल वृत्तीच्या कार्यकर्त्यांमुळे ज्योतीताई व पंकजाताई दुरावा निर्माण होत आहे.
- पंकजाताई तुमच्या जवळच्या कार्यकर्त्यांना आवर घाला या कार्यकर्त्यांमुळे तुमचे मतदान कमी होत आहे.
- पंकजा मुंडे यांनी मराठा समाजाला या प्रश्नावर उत्तर द्यावे .
- स्वर्गीय विनायक मेटे साहेबांनामंत्री करु नये म्हणून कडाडून विरोध केला,
- शिवसंग्रामचे जिल्हा परिषद सदस्य फोडून साहेबांना त्रास दिला मराठा समाज कदापि विसरणार नाही
- आता ज्योतीताई यांच्या विरोधात षडयंत्र का ?
- ज्योतीताई विरोधात टीका  टीका करत भाजपचे दलाल कार्यकर्ते चर्चा करू लागले की मराठा समाजाचे बजरंग सोनवणे पाठिंबा देतील हीच भाजपच्या दलाल भडव्या कार्यकर्त्यांच्या तोंडून चर्चेला उधान
- कोणत्या पक्षाची नेते कार्यकर्ते भेटतील हा त्यांचा प्रश्न ज्योतीताई नेते यांच्या निर्णयामुळे त्या उमेदवाराचे पार्टी तर होणार
- स्वर्गी मेटे साहेब यांच्यावर प्रेम करणारे सर्व क्षेत्रातील राजकीय नेते मंडळी ज्योतीताई मेटे यांचा पाठिंबा मिळवण्यासाठी धडपड करू लागले
- मराठा समाजाचा पंकजा मुंडे यांना पाठिंबा नाहीच विनायकराव मेटे साहेबा यांना त्रास दिला ते आम्ही कसे विसरू शकत नाही
- राजेंद्र मस्केला फोडून स्वर्गीय नेते न त्रास देणाऱ्या पंकजा मुंडे यांना मराठा समाज का मतदान करेल?

बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभा निवडणुकीत सर्व उमेदवार प्रचारात करत आहेत स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या विषयी अस्था प्रेम आदर असणारे दोन उमेदवार आदरणीय ज्योतीताई यांचे आशीर्वाद घेण्यासाठी आले. अतिथी देवो भव हि आपली संस्कृती आलेल्या उमेदवार स्वागत केल्यावर कोणाच्याही पोटात दुखण्याच काय कारण? जिवंत असताना मेटे साहेबाना मंत्रीमंडळ विस्तारात मंत्री करू नये म्हणून कडाडून विरोध केला, मेटे साहेबांचे शिवसंग्राम चे जिल्हा परिषद सदस्य फोडले आता ज्योतिताई यांच्यावर कार्यकर्त्यांकडून बदनामीचे षडयंत्र चालवले तर खपवून घेणार नाहीत पंकजा मुंडे यांच्या कार्यकर्त्यांना गरजेचे आहे अशी चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये ऐकायला मिळत आहे. स्व. मेटे साहेबांच्या प्रथम जयंती दिवशी कार्यकर्ता पुढे करून बैलगाडी शर्यत ठेवता साहेब जिवंत असताना त्रास देऊन पोट भरलं नाही मेटे साहेब गेल्यावर हि मेटे साहेबांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांच्या वर कार्यकर्त्या कडून खालच्या पातळीची टीका करायला लावणे दुर्दैवी आहे. जिवंत असताना विरोध करायचा आणि निवडणुकीत मतासाठी फोटो वापरून बेगडी प्रेम दाखवणे हे दुर्दैवीच, विनायकराव मेटे मेटे साहेब यांनी समाजाच्या हितासाठी आयुष्य वेचलं समजभावनेचा विचार करून समजच्या मताच विभाजन होऊ नये म्हणून ज्योतीताई मेटे यांनी लोकसभा निवडणुकीत माघार घेतली असं असताना दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या पत्नी ज्योतीताई मेटे यांनी कोणावरही टीका केलेली नाही. ज्योतीताई मेटे यांचा स्वभाव शांत सयमी आहे याचा फायदा घेऊन जर कोणी खालच्या पातळीची टीका करत असेल तर मराठा समाजासह अठरापगड जाती धर्मातील लोक व शिवसंग्राम चा कोणताही कार्यकर्ता जाहीर करणार नाही.अशी ही चर्चा जोर धरू लागली आहे. बीड लोकसभेमध्ये भरल्यामध्ये सध्या राजकीय वातावरण भरपूर तापलेली दिसून येत आहे.कोणी जर ज्योतीताई मेटे यांच्या वर विरोधात चर्चा केली तर खपून घेणार नाहीत.

बीड बीड जिल्हा लोकसभा निवडणुकीमध्ये बीड जिल्ह्यातील अनेक जाती धर्माचे निष्ठावंत कार्यकर्ते लोक हे स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्यावरती जीवापाड प्रेम करत होते व आहेत आजची सत्य परिस्थिती पाहता भारतीय जनता पार्टीचे भाजपचे जे कार्यकर्ते आहेत यांनी आज सुद्धा ज्योतीताई मेटे यांची भूमिका ही तटस्थ राहण्याची केली भूमिका जाहीर केली होती परंतु या भूमिकेला आता कुठेतरी एक विरोध म्हणून भाजपचे काही कार्यकर्ते जालना रोडवरील हॉटेलमध्ये ज्योतीताई मेटे यांच्या विरोधामध्ये चर्चा करून त्यांचा पाठिंबा हा मराठा समाजातील बजरंग सोनवणे यांनाच मिळणार आहे अशी चर्चा करू लागले आहेत तर ज्योतीताई मेटे ह्या एक अभ्यासू व अधिकारी राहिलेल्या व स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांच्या पत्नी आहेत ज्योतीताई मेटे यांचा स्वभाव शांत संयमी आहे ज्योतीताई मेटे यांनी स्वर्गीय विनायक रावजी मेटे साहेब यांच्या निधनानंतर बीड जिल्ह्यातील जनतेला धीर देत सर्व जाती धर्मातील लोकांच्या सुखदुःखामध्ये जाऊन त्यांच्या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवीत आपला पाठिंबा दिलेला आहे नक्कीच ज्योतताई मिळते येणाऱ्या काळामध्ये बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये इतिहास घडवतील एवढी मात्र गोष्ट निश्चित आहे म्हणून तर बीड जिल्ह्यातील जनता ही स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांचे विचारावरती चालणारी आहे गेल्या पंचवार्षिकला विनायकराव मेटे साहेब यांनी सांगितले होते की प्रीतम ताई मुंडे यांच्या विरोधामध्ये बीडमध्ये त्यांनी युती न करता महाराष्ट्रामध्ये सर्वत्र युती धर्म पाळला होता यामुळे पंकजाताई मुंडे यांच्या अडचणीत नक्कीच वाढ होणार आहे एवढे मात्र निश्चित आहे

बीड जिल्ह्यामध्ये स्वर्गीय विनायक रावजी मेटे साहेब सांगतील त्याच उमेदवाराला मराठा समाज मतदान करायचा व मराठा समाजासाठी सुद्धा स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांनी हक्क आयुष्य समर्पित केलेला आहे स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्या विचारावरती चालणाऱ्या अठरापगड जातीतील दलित मुस्लिम व मराठा या जातीतील सर्व लोकांना सोबत घेऊन स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांनी प्रश्न सोडवत बीड जिल्ह्यातील जनतेची सेवा केलेली बीड जिल्ह्यातील जनता कदापि विसरणार नाही.

लिंबागणेश येथील एका कार्यक्रमांमध्ये बेलेश्वर संस्थान म्हणून प्रसिद्ध देवस्थान आहे या देवस्थानामध्ये एका विकास कामाच्या निधीसाठी स्वर्गीय विनायक रावजी मेटे व पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती सोबत होती पंकजाताई मुंडे यांची याच कार्यक्रमाच्या स्थळावर एन्ट्री होताच कार्यक्रमाच्या स्टेजवर पंकजाताई व मुंडे साहेब सोबत बसून चर्चा करत असताना खालून घोषणा येत होत्या बीड का नेता कैसा हो राजेंद्र मस्के जैसा हो बीड का आमदार कैसा हो राजेंद्र मस्के जैसा हो त्यावेळी स्वर्गीय विनायक रावजी मेटे साहेब यांना खूप त्रास सहन करावा लागला कारण हा त्रास सहन करताना बीड जिल्हा भाजपचेच हेच दलाल भडव्या वृत्तीचे कार्यकर्ते खालून मुद्दामून विनायकराव मेटे साहेब यांच्या समोर त्या घोषणा देऊन त्यांना त्रास देण्याचे काम करत होते या घोषणा झाल्याच्या नंतर त्याच दिवशी राजेंद्र मस्के यांनी पंकजाताई मुंडे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला व त्यावेळी जात असताना पंकजाताई मुंडे यांनी तत्कालीन जिल्हा अध्यक्ष रमेश पोकळे यांचे पद काढून राजेंद्र मस्के यांना जिल्हाध्यक्ष केले खरे परंतु आजची परिस्थिती पाहता मराठा समाजाला राजेंद्र मस्के यांच्या विरोधात सुद्धा असताना पंकजाताई मुंडे यांना या वर्षाचा सामना करावा लागत आहे बगलबच्चा कार्यकर्त्यांमुळे व या दलाल वृत्तीच्या कार्यकर्त्यांमुळे पंकजाताई तुम्ही आज जनतेच्या मनातून उतरत आहात अशी चर्चा बीड जिल्ह्यातील मराठा समाजात नव्हे तर १८ पगड जातीतून ऐकायला मिळत आहे बीड कामगार कैसा हो राजेंद्र मस्के जैसा हो अशा म्हणणाऱ्या बीडच्या भाजप पदाधिकाऱ्यांना मराठा समाज कदापि माफ करणार नाही अशीही चर्चा यावेळी बीड जिल्ह्यातील जनतेमध्ये जोर धरू लागली आहे.

# बीडच्या विकासाची आणि जाती-जातीतील सलोख्याची तस्करी होऊ देऊ नका; पंकजा मुंडेंची भावनिक साद

बीड : बीड जिल्ह्याच्या विकासासाठी मी प्रयत्न करत असून त्या विकासाची आणि जिल्ह्यातील जाती-जातीतील सलोख्याची तस्करी होऊ देऊ नका अशी साद भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी जनतेला घातली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी बीडमध्ये सभा घेतल्यानंतर पंकजा मुंडे यांनी हे वक्तव्य केलं आहे. बीडमध्ये येत्या १३ मार्च रोजी मतदान होणार आहे.

दोन दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या केज येथील नगरपंचायतच्या नगरसेवकाच्या विरोधात कथित चंदन चोरी प्रकरणात गुन्हा दाखल झाला होता. विशेष म्हणजे या नगरसेवकाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारात देखील सहभाग दिसून आला होता. या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांनी केलेले हे वक्तव्य आता चर्चेत आले आहे.

बीडमध्ये ओबीसी विरुद्ध मराठा वाद?

बीडमध्ये राजकीय वातावरण चांगलंच तापलं असून मराठा आरक्षण आंदोलनाची त्याला किनार असल्याचं बोललं जातंय. मराठा आंदोलनासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे यांनी निवडणुकीत कुणालाही पाठिंबा जाहीर केला नसला तरी मराठा आरक्षणाच्या आड येणाऱ्या नेत्यांना पाडण्याचा आदेश मात्र दिला आहे. त्याचा परिणाम बीडच्या राजकारणावर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बीडमध्ये भाजपच्या पंकजा मुंडे यांच्या विरोधात राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून बजरंग




सोनवणे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. इथं मराठा आरक्षण आंदोलनामुळे चांगलंच आव्हान उभं राहिलं आहे. मराठा विरुद्ध वंजारी, मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष पेटलेला असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपली गॅरंटी देत पंकजा मुंडेंसाठी मतदानाचं आवाहन केलं.

बीडमध्ये मोदींचा जातीऐवजी धर्मावर भर

पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या दोन भव्य सभा बीड आणि अहमदनगरमध्ये झाल्या. या दोन्ही जागा आणि शिर्डी ही तिसरी जागा या महायुतीचा गड राहिल्या आहेत. तरीही कोणताही धोका न पत्करण्याच्या धोरणामुळे मोदींनी इथे सभा घेतल्या. २००९ पासून बीड लोकसभेची निवडणूक ही गोपीनाथ मुंडे या नावाभोवती फिरत आहे. गोपीनाथ मुंडेंच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कन्या असलेल्या पंकजासाठी मोदींनी मतदारांना साद घातली.

मराठा आरक्षण आंदोलनामुळे बीडमध्ये किंवा एकूणच मराठवाड्यात मराठा समाजाच्या भावना सरकार विरुद्ध असल्याचं चित्र सध्यातरी आहे. इथे जातीवर मतांचं ध्रुवीकरण झालं तर त्याचा फायदा मविआला होऊ शकतो असा अंदाज आहे. त्यामुळे मोदींनी इथे भाषणात जाती ऐवजी धर्मावर भर दिला, जिहादी दहशतवादाचा मुद्दा उचलला. हिंदू अस्मितेला कुरवाळण्याचा प्रयत्न केला, राष्ट्रासमोरील इतर धोके मांडण्याचा प्रयत्न केला.

# तलवाडा पोलिस स्टेशनच्या हाद्दीतील गोदाकाठच्या पट्यात रात्री व दिवसा वाळु उपसा सुरुच!

## महसुल व पोलीस प्रशासनास संपर्क केला असता मिळतात ऊडवा ऊडवीचे उत्तर

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलिस स्टेशनच्या हाद्दीतील गोदाकाठच्या पट्यात रात्री व दिवसा आज रोजी वाळु चोरी सुरु आसल्याचे दृश्य प्रतेक दर्शी पहावयास मिळत असुन महसुल व पोलिस प्रशासनाशी संपर्क केला असता ऊडवा ऊडवीचे उत्तर! वाळू चोरी हा गेवराई तालुक्यातील महसुल व संबंधित विभाग यांच्यासाठी जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. महिन्याला किमान एक ते दोन कोटी रुपये या अधिकाऱ्यांना अन त्यांच्या बगलबच्यांना मिळत असल्याची तालुक्यात चर्चा आसतांना त्यामुळे वाळूचोरी कडे यातील संबंधित लोकांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत आहे. एका एका पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच ते सहा ठिकाणी रोज किमान प्रमाणात गाड्या सुरू आहेत. जिल्हाधिकारी अन एसपी याकडे लक्ष देतील का हा प्रश्न उपस्थित होत आहे. गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू आहे. अधिकृत एकही वाळू पट्टा सुरू नसतांना वाळूचा



उपसा मात्र सर्रास सुरू आहे. संपूर्ण गोदावरी काठावर वाळूचा उपसा सुरू असताना कारवाई मात्र होत नसल्याचे चित्र आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोपत पिंपळगाव, पांढरी, बोरगाव थडी गंगावाडी तपे निमगाव, काठोडा येथे केण्या सुरु आसल्यानचे वाळु चोरांच्या या परिसरातील येरझार व सततच्या वास्तव्यावरुन दिसुन येत आहे. या माध्यमातून रोज किमान ५० ते ६० हायवा, ट्रक आणि ट्रॅक्टर भरून वाळू काढली जाते. मात्र हा प्रकार ना पोलीसांना दिसतो ना तहसीलदारांना दिसतो. रोज नदीपात्रातून वाळू उपसा करायचा अन रात्री वाळू वाहतूक करण्यात येते. एका गाडीचे किमान पन्नास हजार रुपये महिना अन जास्तीत जास्त दोन लाख रुपये महिन्याला गोळा केले जातात. हा रेट तहसीलदार यांचा वेगळा अन पोलिसांचा वेगळा आसल्याची चर्चा आहे. एवढंच नाही तर ज्या भागात वाळू विक्री केली जाणार आहे त्या भागातील महसूल अन पोलीस प्रशासनाचे हप्ते वेगळे आसल्याचे बोलल्या जात आहे. महिन्याकाठी दीड ते दोन कोटी रुपये मिळत असल्याने तहसीलदार आणि पोलिसांनी या वाळू माफियांना गोदापात्र मोकळे करून दिले आसल्याची मोठ्या प्रमाणात चर्चा ऐकावयास मिळत आहे. या वाळूमुळे वाळु चोरटे कर्तव्य बजावणा-या ठरावीक पदाधिका-यांच्या जीवावर ऊठल्याचे आणेक उदाहरण आसतांना जिल्हा पोलिस अधीक्षक व जिलाधिकारी कार्यालयाचे दुर्लक्ष गोदाकाठच्या गाव परिसरात धुरवळा ऊडवत आसल्याने सर्व सामान्यांना खुप मोठ्या दुर्धर आजाराना सामोरे जावे लागत असुन जिल्हा पोलिस मुख्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठजन सामान्य जनाच्या जीवावर ऊठल्याचे बोलल्या जात आहे. शासनाच्या लाखो रुपयाच्या महसूलला चुना लावत अधिकारी मात्र मड्याच्या टाळूवरचे लोणी खाण्यात व्यस्त आहेत. या कडे जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी लक्ष देतील का आसा प्रश्न सर्व सामान्यातुन उपस्थित केला जात आहे.

# मोदी सरकारने सर्व सामान्य जनतेची दिशाभूल केली–मोरे

गेवराई (प्रतिनिधी)

बीड लोकसभा उमेदवार बजरंग सोनवणे प्रचारादरम्यान गेवराई तालुक्यात येथे गाठीभेटी गावनिहाय प्रचार दौऱ्याचे आयोजन स्टार प्रचारक म्हणून पुजाताई मोरे यांनी इंडिया आघाडीचे सहकारी पक्ष, पदाधिकारी लहान-मोठे कार्यकर्ते एकत्र येत दि.०२ मे रोजी पासून झंजावत दौरा मतदार संघात करण्यात आला. नरेंद्र मोदी सरकारने सर्व सामान्य जनतेची दिशाभूल केली असून शेतमालाला रास्त

भाव दिला नाही. शेतकऱ्यांना पिकविमा नाही. बहुजन दलित समाजाचे प्रश्न असो, किंवा धनगर आरक्षणाचा प्रश्न असो किंवा मुस्लिम मराठा आरक्षणाचा प्रश्न या विद्यमान सरकारने सोडला नसून जनतेला वाऱ्यावर सोडले आहे असे पुजाताई मोरे यांनी सांगितले. बीड लोकसभा



निवडणुकीच्या रणधुमाळी शेवटच्या टप्प्यात आली. या निवडणुकीच्या अनुषंगाने इंडिया आघाडी व महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून बजरंग सोनवणे यांची घोडदौड जिल्ह्याभरात सुरू आहे.

# शहीन बाग आंदोलनावेळी बजरंग सोनवणे व त्यांची महाविकास आघाडी कुठे होती

# यांना मुस्लिम मते मागण्याचा अधिकार नाही - अशोक हिंगे पाटील

बीड (प्रतिनिधी)

मोदी सरकारकडून सी.ए.ए, एन आर.सी. सारखे जाचक कायदे मुस्लिम समाजावर लादले गेले या विरोधात शाहीन बाग आंदोलन तयार झाले देशभरात उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात आले यावेळी मुस्लिम समाजाच्या खांद्याला खांदा लावून अशोक हिंगे पाटील यांनी आंदोलनात सहभागी होऊन प्रखरपणे विरोध केला अशावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे कुठे होते असा सवाल करत त्यांना मुस्लिम मते मागण्याचा अधिकार नाही असे मत अशोक हिंगे पाटील यांनी व्यक्त केले.

बीड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक अंतिम टप्यात आली असून काल माजलगाव येथे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार प्रचार दौऱ्यासाठी आले होते यावेळी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची शहरातून भव्य दिव्य रॅली मोटार सायकल काढण्यात आली यावेळी हजारोच्या संख्येने मतदार उपस्थित होते यावेळी मतदारांना संबोधित करताना अशोक हिंगे पाटील म्हणाले की देशातील मोदी सरकारने मुस्लिम समाजावर सी.ए.ए, एन.आर.सी, सारखे जाचक कायदे लादून गोरगरीब मुस्लिम समाजाचे जीवन जगणे मुश्किल केले व मुस्लिम समाज भयभीत झाला यामुळे देशातील सर्व मुस्लिम बांधवांनी शहीन बाग आंदोलन पुकारले देशातील प्रत्येक जिल्ह्यात शहीन बाग आंदोलन प्रखरपणे तीव्र स्वरूपात करण्यात आले अशावेळी सेक्युलर म्हणणारे महाविकास आघाडीचे नेते कुठे होते असा प्रश्न अशोक हिंगे पाटील यांनी केला महाविकास आघाडी मुस्लिम समाजाला भारतीय जनता पार्टीची भीती दाखवून मत स्वतःच्या पदरात पडून घेण्याचा डाव आखत आहेत मात्र मुस्लिमांच्या संकट समई उभे न राहणाऱ्या बजरंग सोनवणे व त्यांच्या महाविकास आघाडीला मुस्लिम समाजाची मत मागण्याचा अधिकार नाही असे मत अशोकराव हिंगे पाटील यांनी यांनी व्यक्त केले यावेळी जिल्हाभरातील प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती यामध्ये धम्मानंद साळवे, भारत तांगडे, अंकुश जाधव, अनिल डोंगरे, सचिन उजगरे, बालासाहेब जगतकर, बाबुराव मस्के, डॉ. संजय नाकलगावकर, राजरतन खळगे, रामभाऊ उदमले, संदीप फंदे, राम देशमाने,



पाशाभाई शेख भारतीय बौद्ध महासभेचे श्रीराम मोरे, यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रत्येक वेळी मुस्लिमांना गृहीत धरायचे भाजपाचे भीती दाखवायची आणि मुस्लिम मत पदरात पडून घ्यायची हे महाविकास आघाडीची खेळी यावेळी मुस्लिम समाजाने ओळखले आहे त्यामुळे मुस्लिम समाज कदापिही महाविकास आघाडीच्या भुलतापणा बळी पडणार नाही असे मत मुजमील पटेल यांनी व्यक्त करून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला.

# बीड लोकसभेत पुन्हा कमळ फुलनार :- पवन कुचेकर

बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभेचे मतदान अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपले आहे, भाजपाच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी सध्या प्रचारात मुसंडी मारली असुन जनसामान्य,कष्टकरी, नौकरदार, मजुर,व्यापारी वर्ग यांची पंकजाताई मुंडेना पहीली पसंती मिळत आहे, कारण राजकीय क्षेत्राचा दांडगा अनुभव ,अभ्यासू ,आणी प्रखर राजकीय इच्छाशक्ती च्या जोरावर जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्याची धमक फक्त पंकजाताई मुंडे यांच्यातच असल्यामुळे मतदारांची पहीली पसंती त्यांना मिळत आहे. या लोकसभेत जे मोठया पक्षाचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत त्यांच्यापैकी पंकजाताई मुंडेचा नंबर सगळयात वरचा लागतो ,कारण त्यांचा राजकीय प्रवास पाहता अनुभवी उमेदवार म्हणून त्या एकटयाच आहेत.पंकजाताई मुंडेच्या विजयासाठी जिल्हयातील मात्तबर नेतेमंडळी जिवाचं रान करत आहेत ,बीड जिल्हयाचा विकास भारतीय जनता पार्टी शिवाय आणी पंकजाताई मुंडे शिवाय कुणी करु शकत नाही त्यामुळे योग्य उमेदवार देशाच्या संसदेत बीड जिल्हयाचा प्रतिनिधी म्हणून पोहचला पाहीजे यासाठी या नेतेमंडळीची पंकजाताईंना खंबीर साथ मिळत आहे. गाव, वाडी,वस्तीमध्ये सध्या जिकडे तिकडे कमळ खुललेले दिसत आहे. दस्तुरखुद्द देशाच्या पंतप्रधानांनी बीडच्या मतदारांना मुंडे साहेबांच्या कन्येला संसदेत पाठवण्याची जिम्मेदारी आता तुमची आहे अशी साद घातली आहे. येणाऱ्या काळात बीड जिल्हयात मोठया प्रमाणात विकासाची गंगा आणण्याचा आराखडा मा.पंतप्रधान महोदयांनी जाहीर सभेत बीडकरांना सांगीतला असून ,हा विकासाचा रथ आणण्यासाठी आता पंकजाताई मुंडे यांना निवडणुन आणण्याचा निर्धार बीड जिल्हयातील जनतेने केल्याचे दिसून येत आहे. बालाघाटच्या डोंगररांगेतील गाव,वाडी,वस्तीवर सध्या पंकजाताई मुंडेनाच साथ देणार अशी मतदाराची भावना आहे ,स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या कर्तृत्ववान कन्येला आम्ही आमचे बहुमोल माताचे दान करुन आमच्या हक्काच्या ताईंना विजयी करु असा निर्धार मतदारांनी घेतला आहे ,आमचं मत बीड जिल्हयाच्या आणी देशाच्या विकासाला मत अशी भावना बालाघाटावरील मतदारांची आहे .त्यामुळे आता पकंजाताई मुंडे यांचा विजय निश्चित असुन बीड विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य गोरगरिब कष्टकरी,ऊसतोड मजुर, दलित बहुजन वर्ग आज ताईच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील्याचे चित्र दिसत असुन बीड लोकसभेत पुन्हा पंकजाताई मुंडेच्या रुपाने कमळच फुलनार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे .बीड जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासाठी पंकजाताई मुंडे यांना मोठया मताधिक्याने निवडुन दयावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चा बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांनी केले आहे



# एक दिवस देशासाठी; सर्व कामे मागे ठेवून मतदानाचा हक्क बजवावा

## १०० टक्के मतदान करण्याचे तंज़ीम तरक्की उर्दुचे अध्यक्ष हसीन अख्तर यांचे आवाहन

बीड (प्रतिनिधी)

लोकशाहीत मतदान हा आपला महत्त्वाचा हक्क, अधिकार आहे. त्यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली, आपण ती अजूनही टिकवून ठेवली आहे. लोकशाहीने अनेक सुविधा, अधिकार, हक्क आपल्याला मिळतात नंतर कोणावर बोटं मोडत न बसता योग्य आणि देशाला पुढे घेऊन जाणारे शासन आणि आपला प्रतिनिधी निवडण्याची ही संधी चुकू न देता सर्व कामे मागे ठेवून एक दिवस देशासाठी देत एकही मत न चुकता शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन तंज़ीम तरक्की उर्दुचे अध्यक्ष सय्यद हसीन अख्तर यांनी केले.

एकवेळ भारतात राजेशाही व नंतर इंग्रजांची हुकूमशाही होती. तेव्हा राजाच्या पोटी राजा हुकूमशहाच्या पोटी हुकुमशहा जन्माला यायचा परंतु आपण लोकशाही स्वीकारली असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाने मतदान हा महत्त्वाचा हक्क, अधिकार आपल्याला मिळाला. यामुळे आता मत पेटीतून आपण दिलेल्या मताच्या कौल वरुन लोकप्रतिनिधी निवडून येतो. यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. लोकशाहीने अनेक सुविधा, अधिकार, हक्क आपल्याला दिले आहेत. दर पाच वर्षांनी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी बजाविलेल्या मतदानाच्या अधिकारातून केंद्रात शासन स्थापन होते. येथे चांगली माणसे, चांगली राज्यकर्ते असावेत, असे एक सुजाण नागरिक म्हणून आपल्याला वाटत असेल तर कोणतीही सबब न सांगता अथवा कोणतेही आमिष, प्रलोभन, भीतीला किंवा जाती-पातीच्या मुद्द्याला बळी न पडता प्रत्येकाने मतदान करावे. चांगले राज्यकर्ते निवडून येण्यासाठी आपल्या प्रत्येकाचे एकेक मत महत्त्वाचे आहे. आपल्या देशाला एकसंघ ठेवून विकसीत मार्गावर घेऊन जाणारे शासन आणि प्रतिनिधी निवडून देण्याची नामी संधी देशाच्या संविधानाने मिळालेली आहे. या संधीचे सोने करत आपल्या शेजारी, संपर्कातील, नातेवाईक, मित्र या सर्वांना मतदानासाठी घेऊन जाऊन आपणही मतदानाचा हक्क बजवावा देशाला विकास, शांती, एकता, बंधुभावाच्या मार्गावर घेऊन जाणारे आपले प्रतिनिधी देशाच्या सार्वभौमत्व सभागृहात पाठवावे असे आवाहन तंज़ीम तरक्की ऊर्दूचे जिल्हाध्यक्ष सय्यद हसीन अख्तर, सचिव डॉ. सिराजखान आरजु , कोषाध्यक्ष डॉ. नासेर बागवान यांनी केले आहे.



# ब्रह्मनाथ तांडा येथील नागरिकांचा निवडणुकीवर बहिष्कार!

## पालकमंत्री धनंजय मुंडे साहेबांच्या आश्वासनानंतर तांड्यावरील नागरिकांनी निर्णय माघारी घेतला – रविकांत राठोड

बीड (प्रतिनिधी)

माजलगाव तालुक्यातील ब्रह्मनाथ तांडा या अडीशे ते तीनशे लोक वस्ती असणाऱ्या तांड्यावरील नागरिकांनी तांड्यावरील असुविधा बाबत प्रशासनाला वेळोवेळी निवेदन दिले. मात्र याची दखल न घेतल्यामुळे तांड्यावरील नागरिकांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला होता. या संदर्भात तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले होते याची माहिती बंजारा समाजाचे नेते व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे व्ही.जे.एन.टी. राज्यप्रमुख रविकांत राठोड यांना मिळताच त्यांनी ब्रह्मनाथ तांडा येथील नागरिकांशी संवाद साधत पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याशी तांड्यावरील लोकांचे बोलणे करून दिले तांड्यावरील सर्व समस्या लोकसभा निवडणुकीनंतर सोडवल्या जातील असे आश्वासन धनंजय मुंडे यांच्याकडून मिळाल्यानंतर ब्रह्मणाथ तांड्यावरील नागरिकांनी लोकसभा निवडणुकीवर टाकलेला बहिष्कार पाठीमागे घेतला.

मागील २५ वर्षापासून तांड्याला रस्ता नसल्याने अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे याची दखल रविकांत राठोड यांच्यामार्फत पालकमंत्र्यांनी घेतली व भविष्यात कायमस्वरूपी तांड्याला रस्ता देणार असल्याचे आश्वासन दिल्याने लोकसभा निवडणुकीवर घातलेला बहिष्कार ब्रम्हनाथ तांडा येथील नागरिकांनी परत घेतला आहे. नागरिकांची समजूत घालत निवडणुकावर घातलेला बहिष्कार पाठीमागे घेतल्याबद्दल बंजारा समाजाचे नेते व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व्ही.जे.एन.टी.सेल चे राज्यप्रमुख रविकांत राठोड यांनी गावातील नागरिकांचे आभार मानले असून पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली गाव तांड्यावरील नागरी व मूलभूत सुविधा लवकरच पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन रविकांत राठोड यांनी दिले आहे.



# गेवराईत एसबीआय बँकेत जेष्ठ नागरिकांना व खातेदारांना अपमानास्पद व उद्धट वागणूक मिळत आहे

**शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यासाठी या मॅडम मानसिक त्रास देत आहेत. खासकरून जगदेव गोलाईत(जनरल मॅनेजर),अनुराधा जाधव(शेतकरी लोन अडवाईजर)शुभम घनवट या कर्मचाऱ्यांना कर्तव्यदक्ष मुख्य शाखा प्रबंधक अरविंद रानडे यांनी समज द्यावा अशी मागणी जेष्ठ नागरिक व इतर खातेदारांना कडून होत आहे.**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत रक्कम भरण्यासाठी गेलेल्या जेष्ठ नागरिकांना किंवा काही कामे घेऊन केलेल्या नागरिकांना बँकेच्या कर्मचाऱ्याने अपमानास्पद व उद्धट वागणूक दिल्याने जेष्ठ नागरिकांत व ईतर खातेदारात संतापाची लाट पसरली आहे.

अश्या उद्धट व अपमानास्पद वागणूक मिळत असल्यामुळे खातेदारांना स्टेट बँक ऑफ इंडिया जुन्या बस स्थानक पाठ फिरवली आहे.जगदेव गोलाईत(जनरल मॅनेजर) हे नागरिकांनी आणलेले काम हे तोंड बघून करत आहे ,कागदपत्रे फेकून देने, खालून वरी वरून खाली नागरिकांना चक्रामारवींने काही कागदपत्रे नसल्यास उद्धट पणे ते फेकून देने असे प्रकार वारंवार करत आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गेवराई जुने बस स्टँड जवळील प्रकार श्री अनुराधा जाधव या येथील शाखेतील




शेतकरी कर्ज विभाग मध्ये काम करत असून त्या येणाऱ्या शेतकऱ्यांशी संवाद करताना थोडी उर्मट भाषा वापरत आहेत त्यांना समोर चा माणूस हा किती वयाचा आहे किंवा त्याची लेवल काय आहे हे समजतं नाहीये त्या स्वतलां खूप हुशार समजतात बोलताना तोड सांभाळून बोलत नाहीत शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यासाठी बंद आहे आता होणार नाही. सात बाऱ्यावर नोंद आहे का पिकाची जर तलाठी नोंद करून नोंद होत नसेल तर लेखी दिल्यावर कर्ज देण्यास कुठ गुन्हा आहे का जमीन असते सातबारा असतो तरी मॅडम म्हणतात की होणार नाही

एका शेतकऱ्यांने फाईल देऊन जुलै मध्ये पुर्ण एक वर्ष होईल त्यांच्या वडीलाची शेतकरी कर्ज माफ झालेली फाईल आहे ती अजून केली नाही मॅडम ने होईल पुडच्या महिन्यात त्या शेतकऱ्यांने दोन वेळा कागद नवीन दिलेत अजून मला कर्ज मिळाले नाही चगझडघध या मध्ये कर्ज माफ झालेल्या फाईल बँकेत मजूर होत असून या मॅडम उशीर लाऊन पण करत नाहीत शेतकऱ्यांना पीककर्ज देण्या साठी या मॅडम मानसिक त्रास देत आहेत.या प्रकरणी सदर उर्मट बँक कर्मचाऱ्याने ग्राहकाची आपली वागणूक बदलावी नसता वरिष्ठांनाकडे तक्रार केली जाईल असे नागरिकांकडून समजले आहे, तसेच अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात येणार आहे.असाच एक प्रकार काही दिवसांपूर्वी घडला आहे.गेवराई शहरातील कैलास मोरे हे नेहमीप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत गुरुवार दि . २ मे रोजी सकाळी ११ वाजता गेले होते . त्यांना १ लाख रुपये भरणा करायचा होता . रांगेत लागून त्यांचा नंबर आल्यावर शुभम घनवट या कॅशियरला मोरे यांनी रक्कम दिली आणि घनवट यांनी ती रक्कम मोरे यांच्या अंगावर फेकली . अरेरावीची भाषा करत जेष्ठ नागरिक कैलास मोरे यांना अपमानास्पद वागणूक दिली .दरम्यान याच बँकेने उत्तम व्यवहार करणारे ग्राहक म्हणून कैलास मोरे यांना सन्मानित केले होते .

लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन भाऊ साठे यांचा

# महाविकास आघाडीच्या बॅनर वरती फोटो नसल्याने मातंग समाजातील बांधवांचा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोणवणे यांच्या वरती नाराजिचा सूर

गेवराई (प्रतिनिधी)

साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन भाऊ साठे यांचा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोणवणे यांच्या प्रचार बॅनर वरती फोटो नसल्याने मातंग समाजातील बांधवांचा महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोणवणे यांच्या वरती नाराजी व्यक्त होत असताना दिसून येत आहे. महाविकास



आघाडीचे स्टार प्रचारक असलेले लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू आणि अण्णाभाऊ साठे क्रांतीसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन भाऊ साठे हे महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या सभेत भाषण शैलितून मातंग समाजातील कार्यकर्त्यांचे सचिन भाऊ साठे हे महाराष्ट्र मध्ये महाविकास आघाडीच्या प्रचार्थ सभेला येणार असल्याचे कळाल्यानंतर तेथे मातंग समाजाची प्रचंड गर्दी होत आहे. परंतु बीड जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोणवणे यांनी सचिन भाऊ साठे यांचा बीड जिल्ह्यामध्ये प्रचार सभेच्या बॅनर वरती फोटो नसल्याने मातंग समाजामध्ये आण्णा भाऊ साठे क्रांती सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सुर निघत आहे.अशी चर्चा मातंग समाजातील बांधवांमध्ये होत आहे.

# सुशी येथे आज महंत शिवाजी महाराजांचे काल्याचे किर्तन

गेवराई : गेवराई तालुक्यातील सुशी (व) येथील ३७ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची श्रीक्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज (नारायणगडकर) यांच्या अमृततुल्य काल्याचे कीर्तनाने आज बुधवार दि.८ मे रोजी सांगता होणार आहे.तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ व समस्त भजनी मंडळ,सुशी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



संत कुलभूषण महात्मा सद्गुरू श्री नगदनारायण महाराज व भगवान गोरक्षनाथ महाराज व भगवान कुंभेश्वर यांच्या कृपाशीर्वादाने सुरु असलेल्या सुशी (व) येथील अखंड हरिनाम सप्ताहात सात दिवस महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार मंडळींची सेवा झाली. सप्ताहामुळे गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. तर या सप्ताहाची

श्री क्षेत्र नगद नारायण महाराज संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.महंत गुरुवर्य प्रेममुर्ती शिवाजी महाराज यांच्या अमृततुल्य काल्याच्या किर्तनाने दुपारी ११ ते १ यावेळेत सांगता होणार आहे. व नंतर महाप्रसादाचे वाटप होईल तरी भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पंचक्रोशी परिसर व सुशी समस्त ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे.

# गोपीनाथजी मुंडे यांचं स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी बेटी पंकजावर सोपवलीयं

## अंबाजोगाईच्या विराट जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मागितले जनतेचे आशीर्वाद

### मागील सर्व रेकॉर्ड मोडीत काढून पंकजाताई मुंडे यांना रेकॉर्डब्रेक मतांनी विजयी करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

गोपीनाथजी मुंडे आणि माझे नाते स्नेहाचे होते, म्हणूनच देशाने जेव्हा २०१४ मध्ये मला पहिल्यांदा सेवा करण्याची संधी दिली, त्यावेळी बीडमधून गोपीनाथ मुंडे विजयी झाल्यानंतर त्यांना दिल्लीमध्ये सोबत काम करण्यासाठी घेऊन गेलो होतो, मात्र नियतीने घात केला आणि मुंडेजी आपल्या सर्वापासून हिरावले गेले. मात्र आता दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मी 'बेटी पंकजा मुंडेवर सोपवली आहे, त्यामुळे येत्या १३ तारखेला पंकजा मुंडे यांना आपण प्रचंड मताधिक्यांनी विजयी करावे असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज कृषी महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची जाहीर सभा झाली. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, खासदार प्रीतमताई मुंडे जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे आदींसह जिल्ह्यातील सर्व आमदार, माजी आमदार, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं, रासप, मनसेचे जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच परळी वैद्यनाथ, योगेश्वरी देवी संत भगवान बाबा संत नारायण महाराज यांना नमन करत असल्याचे सांगत बीडच्या आमचे दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांनाही नमन करतो असे सांगत नरेंद्र मोदी यांनी देऊन घेत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत माझे ह्रदयाचे नाते होते, बीड जिल्ह्यासह मराठवाड्याच्या विकासासाठी ते माझ्याशी चर्चा करत. आज मला इथे आल्यानंतर त्यांची खूप आठवण येत आहे. माझे दुर्भाग्य हे राहिले की २०१४ मध्ये तुम्ही मला देशसेवेची पहिल्यांदा संधी दिली तेव्हा मी दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांना बीडमधून निवडून आल्यानंतर दिल्लीला माझ्यासोबत केंद्रात मंत्रीपदी विराजमान केले होते. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे माझ्यापेक्षा जास्त राजकारणाचा अनुभव होता, मात्र त्यांना आपल्याला गमवावे लागले. त्यांच्यासह अरुण जेटली, सुषमा स्वराज, मनोहर पर्रीकर हे जवळचे सहकारी आपल्याला गमवावे लागले. ते नसल्याने त्यांची सतत कमतरता जाणवते अशी खंतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी व्यक्त केली.

आशीर्वाद घेण्यासाठी आलोय

विकसित भारताच्या मिशनवर मोदी काम करत असून या संकल्पसह तुमचे आशीर्वाद घेण्यासाठी आज मी इथे आलो आहे. तुमच्या भविष्याला अधिक चांगले बनवण्यासाठी मी रात्रंदिवस काम करत आहे. तुम्ही सर्वजण माझा परिवार आहात. हक्काचे आरक्षण अडचणीत आले, असाच प्रयोग काँग्रेस सत्तेत आल्यावर देशभरात करू इच्छिते. परंतु मोदी जिवंत असेपर्यंत दलित, आदिवासी, ओबीसी आणि वंचितांचे आरक्षण कोणालाही हिसकावून घेऊ देणार नाही. महाराष्ट्रात काँग्रेस सोबत नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी काँग्रेस आहे तर आमच्या सोबत खरी राष्ट्रवादी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आहे असे सांगत पंतप्रधान मोदी म्हणाले, स्वतःही काही करायचे नाही आणि इतरांनाही काही काम करू द्यायचे नाही हेच काँग्रेसचे आजपर्यंतचे धोरण राहिलेले आहे. मी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरू करण्याचा निर्णय घेतला तेव्हा काँग्रेसने त्याची चेष्टा केली, नंतर विरोध केला नंतर मात्र आम्ही हे काम वेगाने सुरू केले, तेव्हा त्यामध्ये आडवे येण्याचा प्रयत्न त्यांनी केला. हे लोक सत्तेमध्ये आल्यानंतर कोणतेच काम होऊ देणार नाहीत त्यामुळे यांना बाजूला ठेवा एकविसाव्या शतकातील देश विकासासाठी भाजप एनडीए सरकारला प्रचंड बहुमताने विजयी करा. काँग्रेस जिथेही सत्तेत आली तेथे त्यांनी नुकसानच केले. महाराष्ट्र आणि मराठवाडा याचे अनुभव घेत आहे असे सांगत नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली.

मराठवाड्याच्या विकासाची जबाबदारी 'बेटी पंकजा' वर

महाराष्ट्रात आता आमचे सरकार योग्य पद्धतीने काम करत असून या सरकारने सिंचन योजना वेगाने पुढे नेली आहे. राज्यात आम्ही सिंचनाचे २७ प्रकल्प निवडले, त्यातील १० प्रकल्प आता पूर्णही झाले असून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बळीराजा जलसंजीवनी योजना सुरू केली. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मात्र ती योजना रोखली होती, मात्र आता आम्ही पुन्हा ती योजना राज्यात सुरू केली आहे. मराठवाडा खर्या अर्थाने दुष्काळमुक्त करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे. मी गरिबीतून येऊन तुमच्या आशीर्वादाने पंतप्रधान पदापर्यंत पोहोचलो शेतकर्यांचे दुःख मी जाणता, म्हणूनच शेतकर्यांना पिक विमा देण्याची गॅरंटी आम्ही दिली. दरवर्षी बीड जिल्ह्याला ५०० ते ७०० कोटी रुपयांचा विमा मिळतो. महाराष्ट्र सरकार शेतकरी सन्मान निधीतून दरवर्षी शेतकर्यांना सहा हजार रुपये देत आहे, मराठवाड्याचा विकास करणे ही भाजप एनडीए जबाबदारी समजतो, म्हणूनच आम्ही या भागात राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्गांचे जाळे विणले. सुरत -अक्कलकोट, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर या महामार्गासह नगर-बीड-परळी रेल्वे मार्ग निर्माणाचे काम वेगाने सुरू आहे. ही सर्व कामे समोर ठेवून दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांचे स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मी बेटी पंकजा मुंडे यांच्यावर दिली आहे असे ते म्हणाले.

बेटी पंकजाला प्रचंड बहुमताने विजयी करा

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंकजाताई मुंडे यांचा भाषणाच्या सुरुवातीलाच बेटी पंकजा असा उल्लेख केला. येत्या १३ तारखेला पंकजाताई मुंडे यांना मागील सर्व रेकॉर्ड मोडीत काढून तुम्ही सर्वजण प्रचंड मताधिक्याने निवडून देत संसदेत पाठवा असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.



## अन् पंतप्रधानांनी खा.प्रीतमताईंच्या यांच्या डोक्यावर हात ठेवून दिला आशीर्वाद

व्यासपीठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी सर्वांना नमस्कार केला. यादरम्यान खासदार प्रीतमताई मुंडे त्यांना दिसल्या नाही, तेव्हा त्यांनी 'प्रीतम कहा है' अशी विचारणा पंकजा मुंडे यांच्याकडे केली. प्रीतम ताई सूत्रसंचालन करत असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी सांगितल्यानंतर मोदीजींनी त्यांच्या भाषणाच्यावेळी प्रीतमताईंच्या डोक्यावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिले. या भावनिक क्षणाने उपस्थित भारावून गेले.

# चोरट्यांची हिंमत वाढली; चक्क पोलिस अधिकाऱ्यालाच लुटले

**६६ हजार रूपयांचा मुद्देमाल घेऊन चोरटे पसार या घटनेने पोलिसांचा वचक आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

गेवराई (प्रतिनिधी)

चोरी, लुटमारी, घरफोड्यांची वाढती संख्या पोलिसांसाठी डोकेदुखी बनत चालली आहे. आता या चोरट्यांची हिंमत वाढली असून त्यांनी चक्क पोलिस निरीक्षकांनाच अडवून लुटले आहे. हातातील दोन अंगठ्या, रोख रक्कम असा ६६ हजार रूपयांचा मुद्देमाल घेऊन चोरटे पसार झाले.

ही घटना ५ मे रोजी रात्री साडे अकरा वाजता जिल्हा रूग्णालय परिसरातील रोडवर घडली. या घटनेने पोलिसांचा वचक आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कृष्णा उत्तमराव हिस्वनकर (वय ५६ रा.शहानुरवाडी, छत्रपती संभाजीनगर ह.मु. बिंदुसरा पोलिस अधिकारी कॉलनी, बीड) असे लुटलेल्या पोलिस निरीक्षकांचे नाव आहे. हिस्वनकर हे छत्रपती संभाजीनगर येथे एसआरपीएफ ग्रुप - १४ येथे बिनतारी संदेश विभागात कार्यरत आहेत. सध्या लोकसभा निवडणूक असल्याने ते चार दिवसांपासून बीडमध्ये बंदोबस्तासाठी आलेले आहेत.

५ मे रोजी रात्री साडे अकरा वाजता हिस्वनकर हे जिल्हा रूग्णालयाच्या बाजुच्या रस्त्याने बिंदुसरा कॉलनीकडे जात होते. याचवेळी दुचाकीवरून दोघे आले. त्यातील एकाने हिस्वनकर यांना पकडून ठेवले तर दुसऱ्याने त्यांच्या हातातील दोन अंगठ्या, रोख पाच हजार रूपये असा ६६ हजार रूपयांचा मुद्देमाल घेऊन धुम ठोकली. त्यानंतर ७ मे रोजी बीड शहर पोलिस ठाणे गाठत हिस्वनकर यांनी अज्ञात दोन चोरट्यांविरोधात फिर्याद दिली. त्यावरून गुन्हा नोंद झाला आहे.

# मराठा समाजाच्या आरक्षणावर सरकार सकारात्मक - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## पंकजाताई मुंडे साहेबांची लेक, कुठून आली ही तुतारी चल उचलून फेक ; महायुतीच्या विजयात विरोधकांची लंका जळून भस्म होणार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महायुतीच्या तळपत्या विजयात विरोधकांची लंका जळून भस्म होणार आहे. २१ व्या शतकातील सक्षम भारताच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींसारख्या सक्षम नेतृत्वाच्या पाठीशी खंबीर उभे राहण्यासाठी बीड लोकसभा मतदारसंघातून आमचे मित्र गोपीनाथराव मुंडे यांच्या कन्या पंकजाताई मुंडे यांना विक्रमी मतांनी विजयी करा. बीड जिल्ह्यातून एक इतिहास निर्माण करा. बीडमध्ये येत्या ४ जूनला तुतारी उचलून फेका..तिची पिपाणी झाल्याचे दिसले पाहिजे एवढं मताधिक्य पंकजाताईंना द्या असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. दरम्यान मराठा आरक्षणावर सरकार सकारात्मक असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

बोला परळी वैजनाथ महाराज की जय अशा उद्घोषनेने आपल्या भाषणाची सुरुवात करून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी सांगितले की, राज्यातलं तापमान सध्या ४० च्या पुढे गेलंय आणि चार तारखेला महाराष्ट्राचा पारा ४५ पार होईल आणि देशातला ४०० पार होणार आहे. महायुतीच्या या तळपत्या विजयामध्ये विरोधकांची लंका खाक झाल्याशिवाय राहणार नाही. बीड जिल्ह्यात काय होणार ? याची चिंताच नाही. पंकजाताईंचा विक्रमी विजय केल्याशिवाय स्वस्थ बसायचं नाही हा संकल्प करा. बीडमधून तुतारीची पिपाणी करा. विकासाची कास धरा.कारण देशांमध्ये एकच गॅरंटी चालते ती म्हणजे मोदी गॅरंटीआणि आता देशातल्या लोकांनी गॅरंटी घेतली आहे की फिर एक बार मोदी सरकार आणण्याची. त्यामुळे पंकजाताईंची साथ सोडू नका असे आवाहन त्यांनी केले.



पंतप्रधान मोदींना उद्देशुन मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आमच्या बीडची जनता निर्मळ मनाची आहे.मनात काहीही खोट नाही.ज्याला स्विकारलं त्याची साथ कधीही सोडत नाही.बीडच्या जनतेने आमचे मुंडेंना सदैव प्रेम दिलं त्यांचा सदैव सन्मान केला.आज तेच प्रेम व साथ पंकजाताईंना ही जनता देत आहे. त्यामुळे पंकजाताईना विजयी करुन विकासाला ही जनता नक्कीच साथ देणार असा विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले. पंकजाताईंना मत म्हणजे मोदीजींना मत मोदीजींना मत म्हणजे देशाच्या विकासाला मत आहे.ही निवडणूक पंकजाताईंची किंवा तुमची आमची नाहीये ही निवडणूक देश व महाराष्ट्र घडवणारी आहे. ही निवडणूक महासत्ता घडवणारी आहे. ही निवडणूक नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे.म्हणून येत्या १३ तारखेला आपण सगळ्यांनी मिळून पंकजाताईंना प्रचंड मताधिक्याने विजयी करायचं आहे असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

मराठा समाजाने कोणत्याही भुलथापांना बळी पडू नये

यावेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाज बांधवांना खास करून आवाहन केले त्यांनी सांगितले की, काही लोक मराठा समाजामध्ये संभ्रम पसरवतात पण आपल्या सरकारने मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण दिले आहे. कोणत्याही समाजाला धक्का न लावता ते कोर्टात टिकवले. ज्यांनी द्यायला पाहिजे होतं त्यांनी दिलं नाही परंतु आपण दिल्यानंतर ते कोर्टात जातात. परंतु आपलं सरकार मराठा समाजाला दिलेलं आरक्षण टिकवणार. कायद्याच्या चौकटीत बसवणार आणि कुणबी प्रमाणपत्र देण्याचं पण काम सुरू केलं.सगेसोयरेचं पण सुरु आहे.ओबीसी समाज व इतर कुठल्याही समाजावर अन्याय न करता आम्ही मराठा समाजाला न्याय दिला आहे. म्हणून तुम्ही कुणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. तुम्ही कुठेही दिशाभूल करणाऱ्याला बळी पडू नका. अठरापगड जाती धर्माच्या विकासाची गॅरंटी घेणाऱ्या, वंचित उपेक्षित घटकांसाठी सातत्याने काम करणाऱ्या पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीर उभे राहून बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना लोकसभेत विक्रमी मताधिकाने विजयी करा असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.



काल बीड जिल्हा भाजपच्या वतीने महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बीड येथे सभेनिमित्त आयोजन करण्यात आले होते या सभेसाठी महाराष्ट्र राज्याचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांचे स्वागत अंबाजोगाई येथे हेलिपॅड वर करताना केज मतदार संघाच्या लोकप्रिय आमदार नमिताताई मुंदडा यांनी सर्व नेते मंडळींचे स्वागत केले यावेळी नमिता ताई मुंदडा व बीड जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मस्के भाजपाचे प्रवक्ते रामभाऊ कुलकर्णी चंद्रकांत फळ सह बीड जिल्ह्यातील अनेक समर्थक उपस्थित होते.

# ज्वलंत प्रश्नांवर मोदींचे संभाषणच नाही



जनतेतून प्रतिक्रिया

शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, शेतमालाचे भाव,विकास यासारखे ज्वलंत प्रश्नांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बगल देत मतदारांचा भ्रमनिरास केल्याचे चित्र पाहायला मिळालं. अंबाजोगाई येथे भाजपा शिवसेना व मित्र पक्षाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा काल ०७ मे झाली. यावेळी बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, इंडिया आघाडीचे हे लोक, मोदीनी सुरू केलेली किसान सन्मान निधी बंद करतील. गरिबांना मिळणारे मोफत राशन ते बंद करतील आम्ही देशातील ५५ कोटी गरिबांना पाच लाखापर्यंतचा मोफत उपचार देत आहोत तो देखील बंद करतील अशी भीती व्यक्त केली. मात्र प्रधानमंत्री या जाहीर सभेतून विकासाच्या मुद्द्यावर बोलतील ही अपेक्षा फोल ठरली. शेतकरी आत्महत्या, शेतमालाचे पडलेले बाजार भाव, दुष्काळ यावर भाष्य करणं त्यांनी टाळलं. बीड रेल्वे चा प्रश्न ओझरता त्यांनी हाताळल्यामुळे या सभेतून जनतेचा भ्रमनिरास झाला आहे.

# गोदावरी तुटीचे खोरे पाण्याने भरून जिल्ह्यात जलक्रांती करण्यासाठी लोकसभेत पंकजाताईची गॅरंटी हवी - धनंजय मुंडे

**आजची मोदींजींची सभा विजयाचा संकल्प करण्याची नसून पंकजाताईच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी - धनंजय मुंडे**

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यात जवळपास सात लाखापेक्षा अधिक हेक्टर शेती ही जिरायती आहे. गोदावरीचे १६५ टीएमसी तुटीचे खोरे भरून काढण्याच्या प्रकल्पास महायुती सरकारने तत्वतः मान्यता दिलेली आहे. हे तुटीचे खोरे भरून काढल्यास बीड जिल्ह्याला किमान ४२ टीएमसी इतके पाणी मिळेल. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्याने बीड जिल्ह्यातील बहुतांश शेती ही बागायती होणार आहे. या प्रकल्पाचा अंदाजे प्रस्तावित खर्च एक लाख १७ हजार कोटी इतका असून, राज्य व केंद्र सरकारच्या एकत्रित अर्थसहाय्य याचबरोबर अन्य बँकांच्या अर्थसहाय्याने हा प्रकल्प पूर्ण करायचा आहे. त्यासाठी मोदींजींची विकासाची गॅरंटी पंकजाताई जिल्ह्यासाठी पूर्ण करू शकते, असा विश्वास कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज अंबाजोगाई येथे आयोजित विजयी संकल्प सभेत धनंजय मुंडे बोलत होते. सभेला उपस्थित विराट जनसमुदाय पाहून ही सभा विजयाचा संकल्प करणारी नाही तर पंकजाताईच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी आहे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. बीड जिल्ह्याच्या नावापुढे लागलेला मागासलेपणाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्ह्यातील शेती जलयुक्त करणे, उस तोडणाऱ्या हातांना ऊस उत्पादक बनवणे, इथल्या लोकांना इथेच रोजगार मिळवून देणे, हे आमचे ध्येय असून, यासाठी पंकजाताईला संसदेत पाठवणे आवश्यक आहे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

दरम्यान बीड जिल्ह्यात रस्ते व रेल्वेचे काम वेगाने सुरू असून, अंबाजोगाईला देखील घाटनांदूर वरून रेल्वेला जोडण्याची आमची अनेक वर्षांची मागणी सुद्धा आगामी काळात पंकजाताई या मोदींजींच्या नेतृत्वात पूर्ण करतील, अशी अपेक्षाही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

मुंडे बंधू भगिनीने मिळून मोदींजींना बांधला फेटा

दरम्यान या सभेस संबोधित करण्यासाठी आलेले देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मराठवाड्याची ओळख असलेला खास फेटा पंकजाताई मुंडे यांनी दिला, फेटा व्यवस्थित न बसल्याचे पाहून धनंजय पुढे सरसावले व तो फेटा धनंजय मुंडे यांनी बांधून व्यवस्थित बसवून दिला.



# एकाच दिवसात दहा गावात अमोल सरोदे यांच्या प्रचार दौऱ्याचा झंझावात

आष्टी (प्रतिनिधी)

बीड लोकसभा राष्ट्रवादी क्रॉग्रेस पक्ष शरदचंद्र पवार महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांच्या प्रचारार्थ कडा गटांचे गटप्रमुख अमोल दादा सरोदे हे सध्या आष्टी मतदारसंघात गाव,वाडी,वस्ती,तांडा इथपर्यंत मतदारांशी संवाद साधताना दिसत आहेत..यामध्ये अमोल दादा सरोदे हे गावातील प्रत्येक मतदारांशी संवाद साधताना पहावयास मिळत होते,तसेच सकाळी आठ वाजल्यापासून सुरू झालेला हा दौरा रात्री सात वाजेपर्यंत अविरतपणे सुरू असल्याचे चित्र दिसून आले. यामध्ये गावो गावी अमोल दादा सरोदे यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना पहावयास मिळत होता.



या वेळी अमोल दादा सरोदे यांच्या गावोगावी झालेल्या प्रचार दौऱ्यात त्यांनी  राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष शरदचंद्र पवार महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांना तुंतारी फुंकणारा माणुस या चिन्हा समोरील जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन करत विनंती केली.दिवसभर बुधवारी फत्तेवडगांव, चिंचाळा,बेलगाव,पाटणसांगवी, चोभानिमगांव,देव ळाली, घाटाप्रिंपी, धिर्डी,नांदा, शिराळ,या गावांना गाव दौरा करत प्रचार केला आदींसह सर्व गावा सर्व प्रचारादरम्यान गाव भेटीतील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**कारंजा दिनांक ७ मे २०२४ रोजी माय लाईफ स्टाईल कंपनी लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य चे प्रदेश अध्यक्ष ( शेतीपूरक जोड धंदा विकास समिती) गजानन उमाटे यांचा सत्कार करून मोठ्या आनंदात मानसन्मान करण्यात आला.**

**पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज आष्टीत जाहीर सभा**

# मतदार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - मा.आ.भिमरावजी धोंडे

आष्टी (प्रतिनिधी)

भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आज आष्टीत दि.९ मे रोजी जाहीर सभा होणार असून आष्टी विधानसभा मतदारसंघातील बहाद्दर मतदार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आष्टी विधानसभा मतदारसंघाचे मा.आ.भिमरावजी धोंडे यांनी केले आहे.पुढे बोलताना मा.आ.धोंडे म्हणाले की लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असून भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना मतदारांचा व नागरीकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणावर मिळत असून त्यांचा



विजय निश्चित आहे.त्यांनी केलेल्या विकास कामांच्या जोरावर मोठ्या मताधिक्याने निवडून येणार आहेत.जिल्ह्याच्या विकासासाठी व ऊस तोडणारा नाही तर ऊस पिकवणारा जिल्हा व तरुणांना रोजगार देणारा जिल्हा ओळख निर्माण करून देण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना बहाद्दर मतदार बांधवांनी मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे आज दि.९ मे रोजी आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालय येथे सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार असून भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे, रासप नेते महादेवजी जानकर, राजेंद्र म्हस्के, तालुकाध्यक्ष साहेबराव म्हस्के भाजप महायुतीच्या मित्र पक्षातील पदाधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे.तरी आष्टी विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मा.आ.भिमराव धोंडे यांनी केले आहे.

# जिल्ह्याचा विकास पंकजाताईच करु शकतात : शेख इरशाद

बीड (प्रतिनिधी)

सर्व जाती धर्मांना सोबत घेत पंकजाताई मुंडे यांना काम करण्याची संधी देऊन दिल्लीला पाठवण्यात यावे मुस्लिम दलित मराठा या सर्व जाती धर्मांना न्याय देण्यासाठी स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना आयुष्य समर्पित केलेला आहे आता त्यांच्या कन्या संघर्ष कन्या म्हणून ओळख असलेल्या पंकजाताई मुंडे यांना लोकसभेमध्ये पाठविण्यासाठी मुस्लिम समाज हा कटिबद्ध आहे असे उद्गार पंकजाताई मुंडे यांचे समर्थक म्हणून ओळखले जाणारे व पंकजाताई मुंडे साहेब यांच्या परिवारातील सदस्य शेख इर्शाद भाई नेकनुरकर यांनी केले आहे. बीड जिल्ह्याचा विकास फक्त पंकजाताई मुंडेच करू शकतात. दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांचा वारसा पंकजाताई समर्थपणे चालवत आहेत. बीड



जिल्हा सुजलाम सुफलाम भावा याकरिता त्यांनी शेततळे योजना अत्यंत यशस्वीरीत्या राबविली होती. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकास करण्याचे मुंडे साहेबांचे स्वप्न पंकजाताईच पूर्ण करू शकतात. एक सक्षम आणि ताकदीचा खासदार संसदेत पाठविण्यासाठी पंकजाताईंना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले आहे.

# मतदारांनो,जातीय सलोख्याची तस्करी होऊ देऊ नका-पंकजाताई मुंडे यांचं आवाहन

## तुम्हीच माझे मुंडे साहेब, तुम्हीच माझी उर्जा

मला पाच वर्षे मुंडे साहेबांनी मागितले होते मात्र त्यापुर्वीच त्यांचे  निधन झाले. आता तुम्हीच सर्वजण माझे मुंडे साहेब आहात. तुम्हीच माझी उर्जा आहात.असे सांगत तुम्हीच माझी या निवडणुकीत काळजी घ्या. तुमच्या सेवेसाठी मी काम करणार आहे. या निवडणूकीसाठी बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, तुम्ही आता निर्धाराने काम करा. आपला विजयाचा निकाल आता कोणीही बदलू शकत नाही. मला जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे. बीड जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली आणायची आहे. शेतकरी ऊस तोड कामगारांचे जोवन उंचावण्यासाठी काम करायचं आहे, मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली मला हे काम आगामी पाच वर्षात करायचे आहे. जिल्ह्यातील १०  हजार तरुणांना जिल्ह्यात रोजगार उपलब्ध करून घ्यायचा आहे. जिल्ह्यात कॅन्सर रुग्णालय उभारायचे आहे.  मुस्लिम समाज बांधवांनी विरोधकांच्या भूलथापांना बळी पडू नये. त्यामुळे थकायचे आणि रुकायचे नाही विकासासाठी काम करत रहायचे असे सांगत पंकजाताई मुंडे यांनी आता निर्धाराने कामाला लागा, अधिकाधिक मतदान मिळवा, जिल्ह्याच्या विकासासाठी मला प्रचंड मतांनी विजयी करुन संसदेत पाठवा असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ही निवडणूक देशाचे आणि जिल्ह्याचं भलं करण्यासाठी विकासाच्या मुद्यावर आपल्याला लढवायची आहे. त्यामुळे मतदारांनो, निवडणूकीत जातीय सलोख्याची तस्करी होऊ देऊ नका. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या जिल्ह्यात मतदानरूपी आशीर्वाद घेण्यासाठी आले आहेत.मोदींकडे आग्रह करून ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातातील कोयता काढून घेण्यासाठी आगामी काळात मी प्रयत्न करणार आहे. मोदीजींची परवानगी समजून मुस्लिमांना वचन देते की, हा देश

### कोशिश करनेवालोंकी हार नही होती...

यावेळी पंकजाताईंनी आपल्या भाषणात म्हटलेली कविता खूप काही सांगून गेली.डुबकिया सिंधू में गोताखोर लगाता है, जा जा कर खाली हाथ लौटकर आता है। मिलते नही सहज ही मोती गहरे पाणी में, मुठ्ठी उसकी खाली हर बार नही आती, कोशिश करनेवालोंकी कभी हार नही होती। या कवितेच्या ओळीने टाळ्यांचा एकच कडकडाट झाला.




जेवढा तुमच्या आजोबा पणजोबांचा आहे तेवढाच तुमचा देखील राहिल. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मला आपले मतरुपी आशीर्वाद द्या, तुमचे मत विकासासाठी सत्कारणी लावेल अशी ग्वाही भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अलोट जनसागराच्या साक्षीने विराट जाहीर सभा झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, मी विकास केला आहे हे जनता मान्य करते. ही निवडणूक विकासासाठी आहे, राज्याला आणि जिल्ह्याला एकच सरकार हवे आहे.. देशासाठी काम करायची संधी आहे. पक्षाचा आदेश मानणारे आम्ही आहेत.
विकासाबरोबर तरुणाचे भान हरपलं नाही पाहिजे यासाठी आपल्याला काम करायचे आहे. , जो वंचित, उपेक्षित आहे, ज्याचा कोणी वाली नाही त्याची सेवा करण्यासाठी माझ्या पित्याने मला राजकारणात आणलं असल्याचे त्या म्हणाल्या.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT